संचालनालय (शिक्षण) तथा अधिष्ठाता (पशुवैद्यक व पशुविज्ञान विद्या शाखा) यांचे कार्यालय
DIRECTORATE (INSTRUCTIONS) & OFFICE OF THE DEAN, FACULTY OF VETERINARY & ANIMAL SCIENCES
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर -४४० ००१
**MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY,**
Futala Lake Road, NAGPUR – 440 001.
Ph. (O): + 91712-2514669 Website: www.mafsu.in email : didvmafsu@gmail.com

**डॉ. आ. पा. सोमकुवर,** एम.व्ही.एस.सी., पी.एच.डी.
संचालक (शिक्षण) व अधिष्ठाता (पशुवैद्यक व पशुविज्ञान विद्या शाखा)
**Dr. A. P. Somkuwar,** M.V.Sc., Ph.D.
Director (Instructions) & Dean (Faculty of Veterinary & Animal Sciences)

**No. MAFSU/DV/F.No.41/ 55 /2020**
**Date : 18 /05/2020**

# परिपत्रक

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (मपमविवि), नागपूर अंतर्गत पशुवैद्यकिय अभ्यायक्रम हा Veterinary Council of India च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सुरू आहे. तसेच मत्स्य विद्यान व दुग्धतंत्रज्ञान या विद्याशाखांचा अभ्यासक्रम हा ICAR च्या मार्गदर्शक तत्वांच्या आधिन राहून सुरू आहे. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम हा ICAR च्या मार्गदर्शक तत्वानुसार चालतो. उपरोक्त नमुद मार्गदर्शक तत्वांमध्ये फेरबदल करावयाचे झाल्यास विद्यापिठाच्या विद्या परिषदेची परवानगी आवश्यक असते.

सध्याच्या COVID-19 मुळे निर्माण झालेल्या आपातकालीन परिस्थितीमुळे मपमविवि चे विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे मनामध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या संबंधी विद्यार्थ्यांनी व काही पालकांनी विद्यापीठाकडे तशी विचारणा केली आहे. या संदर्भात कळविण्यात येते की सदरिल बाबतीत निरनिराळया स्तरांवरून चर्चा/बैठका घेण्यात आल्या. तसेच UGC, ICAR यांनी प्रकाशित केलेली मार्गदर्शक तत्वे यांच्यावर सुद्धा सांगोपांग चर्चा केलेली आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये व सोबतच त्यांच्या पदव्यांना राष्ट्रीय/अंतरराष्ट्रीय स्तरावरून भविष्यात कोणतीही अडचण निर्माण होवू नये याचा सारासार विचार करण्यात येवून, मपमविवि अंतर्गत महाविद्यालयांसाठी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. विद्यापीठाअंतर्गत तिनही विद्याशाखेचे (पशुविज्ञान, मत्स्यविज्ञान व दुग्धतंत्रज्ञान) शैक्षणिक वर्ष २०१९–२० च्या पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी परीक्षा पुढील सुचने पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.
२. सदरिल परिक्षांचे व शैक्षणिक सत्र/वर्षा चे वेळापत्रक विद्यापिठांच्या विद्या परिषदेच्या अनुमतिने ठरविण्यात येईल.

Scanned by CamScanner

३. शैक्षणिक वर्ष २०१९–२० चे परिक्षांसंबंधी वेळापत्रक तयार करतांना, विद्यार्थ्यांना परिक्षेसाठीची तयारी करण्यासाठी पर्याप्त कालावधी उपलब्ध असेल, याची खातरजमा करण्यात येईल.

या मार्फत सर्व संबंधीत विद्यार्थी, व त्यांचे पालकांना सुचित करण्यात येते की, परिक्षेच्या संदर्भात अधिकृत सूचनांसाठी किंवा माहिती घेण्यासाठी संबंधीत महाविद्यालये तसेच विद्यापिठाच्या संकेतस्थळावर भेट दयावी.

(आ.पा.सोमकुवर)

**माहिती व पुढील कारवाही करीता,**

१) संचालक विस्तार व प्रशिक्षण, मपमविवि नागपूर– कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.
२) सहयोगी अधिष्ठाता – पशुविज्ञान, मत्स्यविज्ञान व दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय मुंबई/नागपूर/परभणी/उदगीर/शिवरळ/अकोला/वरूळ
३) परिक्षा नियंत्रक, मपमविवि नागपूर
४) मा. कुलगुरू माहोदयांचे यांचे खाजगी सचिव, मपमविवि नागपूर

Scanned by CamScanner